**MHBI080001022019**

-

## कि.दि.अ.क्र. ३८/२०१९ मधील निशाणी क्र. २७ खालील आदेश

अर्जदारांनी सदरचा अर्ज मयत मूळ अर्जदार क्र.१ सत्यप्रकाश वासुदेव रुद्रवार याचे वारस अभिलेखावर मुदतीत न घेतल्यामुळे त्याच्या बाबत अबेटमेंट रद्द होऊन मिळण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यांनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की, मुळ अर्जदार सत्यप्रकाश वासुदेव रुद्रवार हा ता. ०४.०८.२०२० रोजी मयत झाला असून त्याचे वारस ९० दिवसाच्या आत म्हणजेच ता. ०३.११.२०२० पर्यंत अभिलेखावर घेणे आवश्यक होते. सदरच्या कालावधीमध्ये राज्यात महामारी चालू होती. त्यामुळे मुळ अर्जदाराचे वारस अभिलेखावर घेण्यास राहून गेले आहे व त्यास बराच विलंब झालेला आहे. अर्जदारांना सदरचा अर्ज प्रलंबीत असल्याचे माहीत नव्हते. त्यामुळे त्यांना सदरचे प्रकरणात मूळ अर्जदाराचे वारस विहीत मुदतीत अभिलेखावर घेता आले नाहीत. सदरचा विलंब अर्जदारांनी जाणीवपुर्वक केलेला नाही. त्यामुळे सदरचा विलंब माफ करणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास सामनेवालाने जबाब दिलेला असून त्यामध्ये म्हटले आहे की, सदरचे अर्जास त्यांची हरकत असून सदरचा अर्ज कायदेशीर नाही व त्यामुळे तो रद्द होण्यास पात्र आहे. सदरचा विलंब माफ करण्यास अर्जदारांनी संयुक्तिक कारण दिले नाही. त्यामुळे सदरचा विलंब माफ करता येणार नाही. म्हणुन त्यांनी सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय ? | ... | होय. |
| २. आदेश काय ? | .. | अंतिम आदेशाप्रमाणे |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र.१ बाबत**

४. मी अर्जदारांतर्फे विद्वान वकील श्री. तौर व सामनेवालातर्फे विद्वान वकील श्री. देशमुख यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. मुळ अर्जदार सत्यप्रकाश वासुदेव रुद्रवार हा ता. ०४.०८.२०२० रोजी मयत झाल्याचे दिसून येते. सदरचा अर्ज दाखल करण्यास विलंब का झाला याबाबतचे संयुक्तिक स्पष्टीकरण अर्जदाराचे वारसांतर्फे देण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ बाबत**

५. सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. २ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदरचा निशाणी क्र.२७ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

GHANWAT SOPAN DASHRATH Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH Date: 2024.06.18 15:31:59 +0530

दिनांक : १८/०६/२०२४

(सो. द. घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माजलगाव.

कि.दि.अ.क्र. ३८/२०१९
निशाणी क्र. २७ खालील आदेश

शेरा

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | ए.एम.दशरथ |
| कोर्टाचे नाव | – | दि. न्या. व. स्तर, माजलगाव |
| न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक | – | १८/०६/२०२४ |
| न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक | – | १८/०६/२०२४ |
| न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक | – | १८/०६/२०२४ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | १८/०६/२०२४ |

स्वाक्षरीत/–

दिनांक – १८/०६/२०२४

(ए.एम्.दशरथ)

लघुलेखक ग्रेड – १,

जिल्हा न्यायालय, माजलगाव